# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दु.क्र. ०७१२— २५६५१४३ फॅ. क्र. ०७१२—२५६१६६३

E-mail:dternag_nag@sancharnet.in web:- rdtenagpur.org.in


क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि/गु.ण/पदविका/२०१२/598

दिनांक:— 28 FEB 2013

प्रति,
प्राचार्य,

सर्व अभि/फार्मसी/नॉन एआयसीटीई संस्था.

विषय:— शैक्षणिक सत्र २०१२—२०१३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र / नॉन—एआयसीटीई पदविका अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या तपासणीबाबत/प्रमाणित करणेबाबत.

संदर्भ :— या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/प्राकाना/शैवि/गु.ण/पदविका/२०१२/५६, दिनांक:— ०५/०१/२०१३

संदर्भाकिंत पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक सत्र २०१२—२०१३ साठी प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र , नॉन एआयसीटीई अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या शासकीय तंत्रनिकेतनाच्या अधिव्याख्यातांकडे सोपविण्यांत आल्या होत्या, अशा सर्व संस्थांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयात दिनांक १०/०१/२०१३ पर्यत तपासणी करुन जमा करण्यांबाबत कळविण्यांत आले होते.
त्याअनुषंगाने ज्या संस्थेची गुणवत्ता यादी अद्यापही या कार्यालयात सादर केलेली नाही अशा संस्थांनी दि. ०२/०३/२०१३ पर्यत गुणवत्ता याद्या सादर कराव्या . त्यानंतर गुणवत्ता याद्या स्विकारल्या जाणार नाही.

तसेच ज्या संस्थेच्या गुणवत्ता याद्या तपासणींत विद्यार्थ्यांच्या काही कागदपत्रांअभावी अथवा संस्थेच्या एफडीआर मुळे या कार्यालयाकडून प्रमाणित करण्यांत आलेली नाही. अशा सर्व संस्थांनी त्वरित कागदपत्रांची पूर्तता करुन तपासणीत आढळलेल्या त्रुटयांची पूर्तता दिनांक ०५/०३/२०१३ पर्यत या कार्यालयात येवून करुन घ्यावी. अन्यथा ज्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत अशा विद्यार्थ्यांना वगळून उर्वरित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी या कार्यालयाकडून प्रमाणित करण्यांत येईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

शैक्षणिक सत्र २०१३—१४ चे प्रवेशासंबंधिचे कामे सुरु झाल्यामुळे वर नमूद केलेल्या दिनांकानंतर गुणवत्ता याद्या मंजूरीचे काम या कार्यालयाकडून करण्यांत येणार नाही याची कृपया सर्व संस्थां प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यांकरिता.

D:/Desktop/ch/edu section/ Merit List-2012-2013